**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक २९ ऑगस्ट २०२५**

**ठळक बातम्या**

1. **जपानी तंत्रज्ञान आणि भारताच्या प्रतिभेच्या एकात्मिकीकरण या शतकातल्या तंत्रज्ञान क्रांतीचं नेतृत्व करू शकते- पंतप्रधान नरेंद्र मोदी.**
2. **राज्याचा विविध कंपन्यांशी सामंजस्य करार, ३३ हजार रोजगार निर्मिती तर ३४ हजार कोटींची होणार गुंतवणूक.**
3. **विविध कार्यक्रमांनी राष्ट्रीय क्रीडा दिन आज साजरा.**
4. **१०१ नक्षल्यांना कंठस्नान घालणाऱ्या गडचिरोलीचे पोलिस उपनिरीक्षक वासुदेव मडावी यांचा सत्कार.**

**आता सविस्तर बातम्या**

पंतप्रधान नरेंद्र मोदी-जपान

जपानी तंत्रज्ञान आणि भारताच्या प्रतिभेचं एकात्मिकीकरण या शतकातल्या तंत्रज्ञान क्रांतीचं नेतृत्व करू शकतं असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. प्रधानमंत्र्यांनी आज जपानची राजधानी टोकियो इथं भारत जपान आर्थिक मंचाला संबोधित केलं. भारत कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर, क्वांटम कॉम्प्युटिंग, जैवतंत्रज्ञान आणि अंतराळ क्षेत्रात महत्वाकांक्षी उपक्रम राबवत आहे, तसंच आता भारत आपल्या संरक्षण आणि अंतराळ क्षेत्रांनंतर, अणुऊर्जा क्षेत्रही खासगी क्षेत्रासाठी खुलं करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. जपानचे प्रधानमंत्री शिगेरू इशिबा यांनीही या मंचाला संबोधित केलं. जपानचं प्रगत तंत्रज्ञान आणि भारताची प्रतिभा एकमेकांना पूरक असल्याचं ते म्हणाले. भारताच्या मेक इन इंडिया उपक्रमात अनेक जपानी कंपन्या महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं. भारतात जपानी कंपन्यांच्या गुंतवणुकीत वाढ झाल्याचे ते म्हणाले

***जापानी कंपनियों ने भारत में 40 बिलियन डॉलर से ज्यादा का निवेश किया है। मात्र पिछले दो वर्षों में 13 बिलियन डॉलर का प्राइवेट इन्वेस्टमेंट हुआ है। जेबीआईसी कहता है कि भारत सबसे प्रोमिसिंग डेस्टीनेशन है। जेट्रो बताता है कि 80% कंपनियां भारत में एक्सपैंड करना चाहती है और 75% ऑलरेडी मुनाफ़े में हैं, यानी इन इंडिया कैपिटल डज़ नॉट जस्ट ग्रो इट मल्टिप्लाइस।***

दोन्ही देशांमध्ये झालेले नवे सहकार्य करार हे भारतात गुंतवणूक वाढवण्याच्या जपानच्या वचनबद्धतेचं प्रतिक असल्याचंही ते म्हणाले.

गुंतवणूक

श्री गणेशोत्सवाच्या शुभमुहूर्तावर महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत आज तब्बल १७ सामंजस्य करारांवर (MoU) स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या करारांची एकूण किंमत सुमारे ३३ हजार ७६८.८९ कोटी रुपये असून, त्यातून राज्यात सुमारे ३३,४८३ रोजगारनिर्मिती होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री  फडणवीस यांनी दिली. या गुंतवणुकीत इलेक्ट्रॉनिक्स, पोलाद, सोलार, इलेक्ट्रिक बसेस व ट्रक्स, संरक्षण व त्यासंबंधित विविध क्षेत्रांचा समावेश आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील उत्तर महाराष्ट्र,

पुणे, विदर्भ, कोकण अशा सर्वच भागांमध्ये उद्योग उभारणीची संधी उपलब्ध होणार आहे. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, की “गुंतवणूकदारांना महाराष्ट्रात सहज आणि सुरळीत अनुभव मिळावा यासाठी सरकार वचनबद्ध आहे. आम्ही फक्त करार स्वाक्षरीत करून थांबणार नाही, तर गुंतवणुकीच्या प्रत्येक टप्प्यावर राज्य शासन भागीदार म्हणून सोबत राहील. याबाबत कुठेही अडथळा येणार नाही.” यावेळी त्यांनी मैत्री पोर्टल या वन-स्टॉप संकल्पनेचा विशेष उल्लेख केला. उद्योगांसाठी जमीन, परवानग्या आणि इतर मंजुरी तातडीने मिळवून देण्याबाबत शासन प्रयत्नशील असल्याचे ते म्हणाले.

मुख्य सचिव राजेश कुमार

राज्याचे मुख्य सचिव राजेश कुमार यांना तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. मुख्य सचिवांना मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव राज्य सरकारने केंद्र सरकारला पाठविला होता. या प्रस्तावाला केंद्राने मान्यता दिली आहे. १ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर २०२५ असा वाढीव काळ राजेश कुमार यांना मिळणार आहे. १९८८ बॅचचे सनदी अधिकारी असणाऱ्या राजेश कुमार यांनी ३० जून २०२५ रोजी राज्याच्या मुख्य सचिव पदाची सूत्रे स्वीकारली होती.

मराठा आरक्षण

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील मुंबईत आझाद मैदानात दाखल झाले असून, त्यांच्या उपोषणाला सुरुवात झाली आहे. आरक्षण मिळाल्याशिवाय मुंबई सोडणार नाही, असा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला. लाखो मराठा बांधव मुंबईमध्ये दाखल झाले असून, या आंदोलनामुळे मुंबईमध्ये मोठी वाहतूक समस्या निर्माण झाली असून विविध मार्ग वळते करण्यात आले आहे.

नेत्रदान पंधरवडा

नेत्रदान पंधरवड्याची सुरुवात 25 ऑगस्ट रोजी नेत्र विभाग जिल्हा सामान्य रुग्णालय भंडारा येथे जिल्हा शल्य चिकित्सक जिल्हा रुग्णालय डॉ. दीपचंद सोयाम यांच्या अध्यक्षतेखाली आज करण्यात आली. या कार्यक्रमांमध्ये ज्यांनी नेत्रदान केलेले आहेत त्यांच्या नातेवाईकांना स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले व त्यांचे मनोगत जाणून घेण्यात आले.

राष्ट्रीय क्रीडा दिन

राष्ट्रीय क्रीडा दिन आज साजरा होत आहे. महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस साजरा केला जातो. ध्यानचंद यांनी १९२५ ते १९४९ या काळात भारताचं प्रतिनिधित्व केलं आणि १९२८, १९३२ आणि १९३६ मध्ये भारताला तीन ऑलिंपिक सुवर्णपदकं मिळवून दिली. शांतीपूर्ण आणि सर्वसमावेशक समाजाला प्रोत्साहन देण्यासाठी खेळ, ही यंदाची या दिवसाची संकल्पना आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी क्रीडा दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. देशातल्या क्रीडा क्षेत्रात क्रांतिकारी बदल होत आहेत, ज्यामध्ये तरुण प्रतिभेला प्रोत्साहन देण्यापासून ते जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा विकसित करण्यापर्यंतचे कार्यक्रम राबवले जात असल्याचं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. वर्धा जिल्ह्यातल्या महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिना निमित्त विविध क्रीडा उपक्रम आयोजित करण्यात येत आहेत. शरीर, मन स्वास्थ्यासाठी खेळ महत्वाचे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी खेळाडू वृत्ती ठेवावी, असे आवाहन कुलगुरू डॉ.मिलींद बारहाते

यांनी केले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग आणि पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय क्रीडा दिवसानिमित्त आयोजित विविध क्रीडा स्पर्धांचे कुलगुरूंनी फित कापून उद्घाटन केले, त्याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. खामगावच्या वसुंधरा बहुउद्देशीय सामाजिक संस्था द्वारा संचालित सिद्धिविनायक तंत्र महाविद्यालय टेक्निकल कॅम्पस शेगाव इथं 'राष्ट्रीय क्रीडा दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. योगा, धावण्याच्या शर्यती कबड्डी, खो-खो, रस्सीखेच, लिंबू चमचा, लगोरी असे अनेक स्पर्धा या ठिकाणी आयोजित करण्यात आल्या होत्या.

क्रिडा स्पर्धेत विशेष कामगिरी

आंतराष्ट्रीय, आशियायी तसेच राष्ट्रीय पातळीवरील क्रिडा स्पर्धेत विशेष कामगिरी करणाऱ्या महाराष्ट्रातील खेळाडुंना द्यायच्या रोख पारितोषकांसाठी २८ कोटी ६८ लाखांच्या तरतुदीस राज्य सरकारने मान्यता दिली आहे. क्रिडा विभागाने गुरूवारी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार आंतराष्ट्रीय स्तरावरील कामगिरीसाठी १६ तर राष्ट्रीय स्तरावरील ३१७ यशस्वी खेळाडूंना तसेच त्यांच्या प्रशिक्षकांना ही प्रोत्साहनपर रक्कम वितरीत केली जाणार आहे. त्यासाठी एकूण २८ कोटी ६८ लाख १७ हजार ५०० रूपये क्रिडा विभागाकडून तरतुद करण्यात आली आहे.

पोलिस उपनिरीक्षक वासुदेव मडावी

गडचिरोली पोलिस दलातील २७ वर्षांच्या सेवेत १०१ नक्षल्यांना कंठस्नान घालून ५ नक्षल्यांना अटक करण्यात महत्वाची भूमिका बजावणारे सी-६० पथकाचे कमांडर, पोलिस उपनिरीक्षक वासुदेव मडावी यांचा पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. 49 वर्षीय वासुदेव राजम मडावी हे एप्रिल १९९८ मध्ये गडचिरोली पोलिस दलात शिपाई म्हणून रुजू झाले. जवळपास २७ वर्षे ते नक्षल्यांविरुद्धच्या लढ्यात कर्तव्य बजावत आहेत. पोलिस शिपाई ते उपनिरीक्षक पदापर्यंतच्या त्यांच्या प्रवासात त्यांना ३ वेगवर्धीत पदोन्नती मिळाल्या आहेत. एकूण ५८ चकमकींमध्ये ते सहभागी झाले. त्यांनी आजतागायत १०१ नक्षल्यांना कंठस्नान घातले, तर ५ नक्षल्यांना अटक केली. मडावी यांना यापूर्वी राष्ट्रपतींचे पोलिस शौर्य पदक, असाधारण आसूचना कुशलता पदक व पोलिस महासंचालकांचे सन्मानचिन्हही प्राप्त झाले आहे.

हवामान

नागपूरच्या प्रादेशिक हवामान खात्याने आज संपूर्ण विदर्भात हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता वर्तवली असून, तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह मेघेगर्जनेचेही शक्यता आहे. दरम्यान येत्या काही तासात अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ आणि चंद्रपूर येथे काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ येण्याची शक्यता आहे. तर वर्धा, यवतमाळ आणि चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने आहे.

प्रवेश परीक्षा

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या एमबीए शिक्षणक्रमाच्या २०२५-२६ साठी होणाऱ्या प्रवेश परीक्षेच्या नोंदणी आणि परीक्षेच्या कालावधीस मुदतवाढ देण्यात आली आहे. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.संजीव सोनवणे यांच्या निर्देशानुसार सदर शिक्षणक्रमांच्या प्रवेश परीक्षा नोंदणीची नवीन

मुदत येत्या दिनांक २९ ऑगस्ट अशी असून प्रवेश परीक्षा देण्याची नवीन मुदत दिनांक ३० ऑगस्ट आहे. नोंदणी आणि परीक्षा दोन्हीही २४ तास सुरू राहतील. विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षेसाठी https://ycmapp.ycmou.org.in/login या अधिकृत लिंकवर जाऊन नोंदणी व परीक्षा प्रक्रिया पूर्ण करावी.

*****